# BDC LIBRARY

## New Paper Clipping

## A.Y. 2023-202



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. एस. पी. पाटील, व्यासपीठावर इतर मान्यवर.

# ताणतणाव टाळण्यासाठी खळखळून हसा : डॉ. पाटील

▲ **पाटण**, दि. १९ : धकाधकीच्या आयुष्यात माणसाचा निवांतपणा हरवला आहे. ताणतणाव आणि दगदग जीवनाचा हिस्सा झाला आहे. त्याचा परिणाम व्यक्तीच्या शारीरिक व मानसिक स्वास्थ्यावर होत असतो. हे जर टाळायचे असेल तर खळखळून हसा. जीवनातील ताणतणाव टाळण्यासाठी खळखळून हसले पाहिजे, असे मत प्रा. डॉ. संतोष पाटील यांनी व्यक्त केले.

शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे महाविद्यालय, कराडच्या विशेष श्रमसंस्कार शिबिरप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी रयत सहकारी कारखान्याचे माजी संचालक शंकरराव पाटील होते. यावेळी राहुल काळोखे, अभियंता शरद पवार, सहाय्यक संचालक सुनील पवार, कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. सुभाष कांबळे, प्रा. सचिन बोलाइकर यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रा. डॉ. एस. पी. पाटील म्हणाले, हास्य हा जीवनाचा अविभाज्य भाग आहे. प्रत्येक प्रसंगात विनोद लपलेला असतो. तो आपण शोधला पाहिजे, असे सांगून आपल्या काव्यमय विनोदी शैलीने विविध विनोदी चुटकुल्यांनी शिबिरातील विद्यार्थ्यांना खळखळून हसविले.

शंकरराव पाटील म्हणाले, प्रत्येकाच्या आयुष्यात आई-वडिलांचे अढळ स्थान असते. आयुष्यात कधीच आपले आई-वडील, आपले गुरुजन यांना विसरू नका. अश्विनी सावंत यांनी प्रास्ताविक केले. अमर पवार यांनी आभार मानले. ओंकार पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

कार्यक्रमास प्रा. अण्णासाहेब पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व समिती सदस्य, चचेगाव गावचे ग्रामस्थ व विद्यार्थी-विद्यार्थिनी, स्वयंसेवक उपस्थित होते.